# प्रेसनोट

पुणे शहरातील शाळा व महाविदयालयाच्या विदयार्थ्यांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करुन संकटकाळात पोलीस दलाकडुन प्रभावी प्रतिसाद देण्याकरीता मा. श्रीमती रश्मी शुक्ला,पोलीस आयुक्त पुणे शहर यांच्या संकल्पनेतुन पुणे शहर पोलीस दलातर्फे **"पोलीस काका"** हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

पुणे शहरामध्ये सुमारे ११८० शाळा व महाविद्यालये आहेत. त्यामध्ये विविध ठिकाणाहुन येऊन दहा लाख पेक्षा अधिक विदयार्थी शिक्षण घेत आहेत. बऱ्याचदा त्यांना छेडछाड, दादागीरी , रॅगींग अशा समस्यांना तोंड दयावे लागते. कधी-कधी शाळा कॉलेज परिसरात अंमली पदार्थांचीं विक्री केली जाते. स्मार्ट फोन व इंटरनेटच्या वाढत्या वापरासोबत विदयार्थ्यांना काही वेळा सायबर क्राईमचा सामना करावा लागतो अशा प्रसंगामध्ये विदयार्थी-विदयार्थीनींना पोलीसांशी तात्काळ संपर्क साधुन मार्गदर्शन व मदत मिळावी यासाठी **"पोलीस काका"** या उपक्रमाची आखणी करण्यात आलेली आहे.

**"पोलीस काका"** म्हणजे शाळा व महाविदयालयातील विदयार्थी यांना संकटकाळात कायदेशीर मदत करण्यासाठी तात्काळ धावुन येणारा मित्र व मार्गदर्शक होय. यानुसार **"पोलीस काका"** म्हणुन प्रत्येक शाळेकरीता एक वरिष्ठ पोलीस कर्मचारी नेमुन देण्यात येत आहे. त्यांचा मोबाईल क्रमांक व फोटो शाळेच्या दर्शनी भागात लावण्यात येणार आहे. प्रत्येक शाळेमध्ये **"पोलीस काका"** उपक्रमाची माहीती हे संबधीत पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक/ पोलीस निरीक्षक देतील. त्यावेळी पोलीस काकांची व विदयार्थ्यांची ओळख करुन देण्यात येणार आहे व पोलीस काकांची कोणत्या परिस्थीतीत कशाप्रकारे मदत मिळवायची याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. आतापर्यंत सुमारे १९५ पोलीस कर्मचारी यांची **"पोलीस काका"** करीता निवड करण्यात आलेली आहे.

कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी **"पोलीस काका"** यांना विदयार्थ्यांचा फोन आल्यास **"पोलीस काका"** त्यास मार्गदर्शन व मदत करतील. आवश्यकता असल्यास व्यक्तीशः अगर बीट मार्शल किंवा पोलीस स्टाफसह मदतीस धावुन जातील व योग्य कायदेशीर मदत करतील. वेळोवेळी शाळा व कॉलेजेस यांना भेटी देऊन विदयार्थ्यांशी हितगुज करतील,तसेच वेगवेगळया विषयाबददल मार्गदर्शन करतील जेणेकरुन पोलीस व विदयार्थ्यांमध्ये एक विश्वास निर्माण होईल व मैत्रीपुर्ण संबध निर्माण होतील. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये पोलीस काकांच्या कामाची देखरेख करण्यासाठी एक सहायक पोलीस निरीक्षक दर्जाचा अधिकारी नोडल ऑफिसर म्हणुन कामकाज पाहील त्यांच्यावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे थेट नियंत्रण राहील. शाळा अगर महाविदयालयाकडुनही एक शिक्षक अगर प्राध्यापक नोडल ऑफिसर म्हणुन राहतील. संबधीत विभागाचे सहायक पोलीस आयुक्त व पोलीस उपायुक्त त्यांच्या कार्यक्षेत्रात सदर उपक्रम प्रभावीरित्या राबवुन घेतील.

सदर उपक्रमाकरीता पोलीस आयुक्तालय पुणे शहर येथे **"पोलीस काका"** व वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे करीता एक दिवसाचा प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आलेला असुन त्यावेळी मा. पोलीस आयुक्त यांनी या उपक्रमाबाबत त्यांना मार्गदर्शन केले आहे.